Epaper

दैनिक
जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १५९ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION

अन्न सुरक्षा विभागाची कारवाई; ३.२६ लाखांचा संशयित साठा जप्त!

(पान २ वर)



मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे आश्वासन; पाणीप्रश्नावर सरकारची भूमिका स्पष्ट

5 ऑक्टोबरनंतरचे सर्व पंचनामे करणार!

५ ऑक्टोबरनंतरच्या नुकसानीचे पंचनामे करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

जन सम्राट टाईम्स

छत्रपती संभाजीनगर । : मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी त्यांनी हुतात्मा स्मारक स्मृतीस्तंभाला पुष्पचक्र अर्पण करून मराठवाडा मुक्तिसंग्रामातील हुतात्म्यांना अभिवादन केले. आपल्या भाषणातून त्यांनी मराठवाड्याच्या ऐतिहासिक संघर्षासह दुष्काळ, शेतकरी, कर्जमुक्ती, कृषी वीजबिल, पाणीप्रश्न आणि नदीजोड प्रकल्पांबाबत सरकारची भूमिका मांडली.

"सरकार कुठल्याही परिस्थितीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही," असे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. मराठवाड्यात यंदाही दुष्काळाचे संकट निर्माण झाले असून शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सरकारने आतापासूनच तयारी सुरू केली आहे. ५ ऑक्टोबरनंतर झालेल्या नुकसानीचे सर्व पंचनामे करण्यात येतील. एनडीआरएफची मदत मिळण्यापूर्वीही राज्य सरकारकडून आवश्यक मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या इतिहासाचा उल्लेख करताना फडणवीस म्हणाले की, भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य



मिळाले; मात्र तत्कालीन हैदराबाद संस्थानातील मराठवाड्याला १७ सप्टेंबर १९४८ रोजी मुक्ती मिळाली. या लढ्यात अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी बलिदान दिले. त्यावेळी मराठी भाषेवर निर्बंध आणि नागरिकांवर अत्याचाराची परिस्थिती होती. अशा प्रतिकूल परिस्थितीतून मराठवाड्याला मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी संघर्ष केला, असे त्यांनी नमूद केले. दुष्काळाच्या संकटावर बोलताना फडणवीस यांनी चारा उपलब्धतेसाठी सरकारने केलेल्या नियोजनाचा उल्लेख केला. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेचा लाभ मराठवाड्यातील शेतकऱ्यांना मिळत असून उर्वरित याद्याही लवकरच जाहीर होतील, असे त्यांनी सांगितले. कृषी वीजबिलाच्या थकबाकीबाबतही सरकारने निर्णय घेतल्याचे त्यांनी नमूद केले. मराठवाड्याचा दुष्काळ कायमचा दूर करण्यासाठी जलसंधारणासोबत मोठ्या जलप्रकल्पांवर भर देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. कृष्णा खोऱ्यातील अतिरिक्त पाणी मराठवाड्यात आणण्याच्या प्रकल्पाला पुढे नेण्यात येत असून सुमारे ३० टीएमसी अतिरिक्त पाणी उपलब्ध होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

न्यायिक आढावा घेण्यासाठी बसलोय: कोर्ट

बीड येथे झालेल्या मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम हा स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा असल्याचे सांगितले. त्यांचे वडील बाजीराव पाटील हे या संग्रामात सहभागी झाले होते, हा आपल्यासाठी अभिमानाचा वारसा असल्याचे त्यांनी नमूद केले. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाचा गौरव करत बीड जिल्ह्याचे या लढ्यातील योगदानही त्यांनी अधोरेखित केले.

तसेच कोकणातील पाणी गोदावरी खोऱ्यात आणण्यासाठी नदीजोड प्रकल्पाचा डीपीआर अंतिम टप्प्यात असून उल्हास खोऱ्यातून गोदावरी खोऱ्यात ७० टीएमसी पाणी आणण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले.

छत्रपती संभाजीनगरच्या पाणीपुरवठा योजनेचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे सांगत शहराला नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध होईल, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला. शहरात वाढणाऱ्या गुंतवणुकीच्या पार्श्वभूमीवर आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

Selected

"एन. चंद्रशेखरन यांची फेरनियुक्ती बेकायदेशीर"

मुंबई : टाटा सन्समध्ये ६६ टक्के हिस्सा असलेल्या टाटा ट्रस्ट्सने एन. चंद्रशेखरन यांची टाटा सन्सच्या अध्यक्षपदी पुन्हा नियुक्ती करण्याच्या प्रस्तावाला विरोध केला आहे. कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत हा प्रस्ताव मांडण्यात आला होता. यावेळी चंद्रशेखरन यांच्या फेरनियुक्तीच्या प्रस्तावाच्या बाजूने टाटा सन्सच्या चार संचालकांनी मतदान केले. तर टाटा ट्रस्ट्सचे संचालक नोएल टाटा यांनी प्रस्तावाच्या विरोधात मतदान केले. टाटा सन्सच्या 'आर्टिकल्स ऑफ असोसिएशन'मधील नियमांनुसार हा प्रस्ताव कायदेशीरदृष्ट्या वैध नसल्याचे टाटा ट्रस्ट्सने म्हटले आहे. "टाटा सन्सच्या नियमांनुसार अध्यक्षाची नियुक्ती करण्यासाठी ट्रस्टच्या दोन्ही नामनिर्देशित संचालकांनी प्रस्तावाच्या बाजूने मतदान करणे आवश्यक आहे. हा नियम नवीन अध्यक्षाची नियुक्ती असो किंवा विद्यमान अध्यक्षाची फेरनियुक्ती असो, दोन्ही परिस्थितीत लागू होतो.

'ब्रिटीश एअरवेज'मध्ये राहिलेला मोबाईल मिळवण्यासाठी यंत्रणांची पहाटेपर्यंत धावाधाव

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे लंडन दौऱ्यावरुन रविवारी पहाटे मुंबईत परतले, पण त्यांचा भ्रमणध्वनी चक्क विमानात विसरला. घरी पोचल्यावर आपला भ्रमणध्वनी नसल्याचे त्यांचे लक्षात आले. विसरलेला भ्रमणध्वनी विमानतळावर घेण्यासाठी पोलीसांना तातडीने पाठवण्यात आले. बरीच धावाधाव करुन पोलीसांनी पहाटे चार वाजता शिंदे यांना गहाळ झालेला भ्रमणध्वनी आणून दिला. ५ सप्टेंबर रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या खास सहकाऱ्यांसह आठवड्याच्या लंडनच्या दौऱ्यावर निघाले. ब्रिटीश संसदेच्या 'हाऊस ऑफ लॉर्डस'मध्ये 'कॉमनवेल्थ लिडरशीप रेकग्नेशन', 'हाऊस ऑफ कॉमन्स'मध्ये 'स्टेटसमनशिप' अॅवार्ड आणि महाराष्ट्र मंडळाच्या वतीने 'ग्लोबल प्राईड ऑफ महाराष्ट्र' असे तीन पुरस्कार शिंदे यांना मोठ्या थाटात प्रदान करण्यात आले. साहेबांचे लंडन पाहून, क्रीकेटपटू विराट कोहली यांची भेट घेऊन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निवास केलेल्या स्मृतीस्थळाला भेट देऊन आणि लंडनच्या रस्त्यावर वडा पावचा आस्वाद घेऊन शिंदे १२ सप्टेंबर रोजी मुंबईत परतले. दोन्ही वेळी त्यांचा 'ब्रिटीश एअरवेज'ने प्रवास झाला. जाताना स्वित्झर्लंडमध्ये झुरीच येथे थांबा होता. येताना मात्र सलग नऊ तासाचा विमान प्रवास झाला. लंडन हे भारतीय प्रमाण वेळेच्या साडेचार तास मागे आहे. पहाटे २ वाजता शिंदे यांचे विमान छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले. शिंदे यांच्या स्वागताला प्रकाश सुर्वे, मुरजी पटेल आणि तुकाराम काते हे शिवसेनेचे आमदार आपल्या कार्यकर्त्यांसह हजर होते. दूरचित्रवाहिन्यांचे प्रतिनिधीही होते. त्यामुळे विमानातून उतरल्यानंतर हारतुरे स्वीकारण्यात आणि



वाहिन्यांना पुरस्काराची माहिती देण्यात शिंदे यांचा बराच वेळ गेला. व्हिडीओ कॉलवर अधिक बोलणे होत असल्यामुळे शिंदे 'अॅपल'चा भ्रमणध्वनी वापरतात. सभा असतात तेव्हा तो स्वीय सहायकाकडे देतात, इतर वेळी त्यांच्याकडेच असतो. परतीच्या प्रवासात शिंदे यांच्या अंगावर ब्लेझर होता. घरी पोचल्यानंतर पहाटे तीन वाजता भ्रमणध्वनी नसल्याचे शिंदे यांच्या लक्षात आले. सुरक्षेवरील पोलीसांना लागलीच तशी माहिती देण्यात आली. विमानतळावरील 'ब्रिटीश एअरवेज'च्या सुरक्षा कार्यालयाशी पोलीसांकडून संपर्क साधण्यात आला. प्रवासी उतरल्यानंतर विमान कंपनीच्या सुरक्षा विभागाकडून विमानाची तपासणी होते. परंतु, काही वेळेस प्रवाशांची वस्तू छोटी असल्यास सुरक्षा रक्षकांच्या नजरेतून सुटते. अखेर बरीच धावाधाव करुन पहाटे पाच वाजता शिंदे यांच्याकडे पोलिसांनी भ्रमणध्वनी पोचवला. भ्रमणध्वनी हाती येईपर्यंत शिंदे घरी जागेच होते. शिंदे मुख्यमंत्री असतानाही त्यांचा भ्रमणध्वनी गहाळ झाला होता.यावेळी विमानात आणि तोसुद्धा 'ब्रिटीश एअरवेज'मध्ये विसरल्याने यंत्रणांना धावाधाव करावी लागली. राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे लंडन दौऱ्यावरुन रविवारी पहाटे मुंबईत परतले, पण त्यांचा भ्रमणध्वनी चक्क विमानात विसरला. घरी पोचल्यावर आपला भ्रमणध्वनी नसल्याचे त्यांचे लक्षात आले. विसरलेला भ्रमणध्वनी विमानतळावर घेण्यासाठी पोलीसांना तातडीने पाठवण्यात आले. बरीच धावाधाव करुन पोलीसांनी पहाटे चार वाजता शिंदे यांना गहाळ झालेला भ्रमणध्वनी आणून दिला. ५ सप्टेंबर रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या खास सहकाऱ्यांसह आठवड्याच्या लंडनच्या दौऱ्यावर निघाले. ब्रिटीश संसदेच्या 'हाऊस ऑफ लॉर्डस'मध्ये 'हाऊस ऑफ कॉमन्स'मध्ये 'स्टेटसमनशिप' अॅवार्ड आणि महाराष्ट्र मंडळाच्या वतीने 'ग्लोबल प्राईड ऑफ महाराष्ट्र' असे तीन पुरस्कार शिंदे यांना मोठ्या थाटात प्रदान करण्यात आले. साहेबांचे लंडन पाहून, क्रीकेटपटू विराट कोहली यांची भेट घेऊन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निवास केलेल्या स्मृतीस्थळाला भेट देऊन आणि लंडनच्या रस्त्यावर वडा पावचा आस्वाद घेऊन शिंदे १२ सप्टेंबर रोजी मुंबईत परतले. दोन्ही वेळी त्यांचा 'ब्रिटीश एअरवेज'ने प्रवास झाला.

गोळ्या घाला तरी येथून हटणार नाही

जन सम्राट टाईम्स

परभणी |प्रतिनिधी: धनगर समाजाच्या सर्व नेत्यांना मुख्यमंत्र्यांनी मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते मात्र अजूनही समाजाला काहीच मिळाले नाही. त्यामुळे जोवर ठोस निर्णय होत नाही तोवर आपण या ठिकाणाहून बाजूला जाणार नाही अशी भूमिका धनगर समाज आरक्षण आंदोलनाचे नेते दीपक बोऱ्हाडे यांनी घेतली. आपल्याला अटक करा, गोळ्या घाला तरी आपण येथून जाणार नाही असे त्यांनी सांगितल्याने पोलीस यंत्रणेची एकच लगबग उडाली. जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत हे अखेर महामोर्चाच्या ठिकाणी सायंकाळी दाखल झाले पण बोऱ्हाडे हे आपल्या भूमिकेवर ठाम होते. आज गुरुवारी (दि.१७) परभणीत धनगर समाजाचा मोठा मोर्चा निघाला होता. या मोर्चात विविध पक्षातील धनगर समाजाचे नेते, कार्यकर्ते व राज्याच्या कानाकोपऱ्यातून लोक आले होते. सभा संपल्यानंतर धनगर आरक्षण आंदोलनाचे नेते दीपक बोऱ्हाडे यांनी आपण या ठिकाणाहून हटणार नसल्याचे स्पष्ट केले. कार्यकर्त्यांनाही त्यांनी येथून जाऊ नका असे आवाहन केले. दुपारी उशिरा सभा संपल्यानंतरही जमाव तिथेच बसून होता. सायंकाळी पोलीस यंत्रणेवर मोठा ताण आल्याचे दिसून आले. पोलीस अधीक्षक कुमावत हे घटनास्थळी आले. त्यांनीही दीपक बोऱ्हाडे यांना हे आंदोलन थांबवण्याची मागणी केली तथापि बोऱ्हाडे आपल्या भूमिकेवर ठाम होते. ज्या व्यासपीठावरून भाषणे झाली त्याच व्यासपीठावर बोऱ्हाडे हे बराच वेळ बसून होते. मोर्चातील भाषणे संपल्यानंतर जमाव पांगला मात्र बोऱ्हाडे यांनी घटनास्थळावरून न हटण्याची भूमिका घेतल्याने लोक पुन्हा जमा झाले. सायंकाळी धनगर समाजाचे आणखी काही नेते घटनास्थळी दाखल झाले. यावेळी राज्याच्या काही मंत्र्यांसह उच्चपदस्थांना भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला जात होता.

व्यापाऱ्यांचा मोर्चा रोखीकडे 'यूपीआय'चा भार, 'क्यूआर'ला नकार

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: केंद्र सरकारने 'यूपीआय' व्यवहारांवर अतिरिक्त शुल्क (एमडीआर) आकारण्याची घोषणा केल्याने व्यापारी वर्गातून नाराजीचा सूर उमटत आहे. या संभाव्य आर्थिक भाराला विरोध दर्शवण्यासाठी अंबरनाथ व उल्हासनगरातील व्यापाऱ्यांनी गुरुवारपासून दुकानांवरील 'यूपीआय पेमेंट'चे फलक आणि 'क्यूआर कोड' हटवण्यास सुरुवात केली आहे. उल्हासनगर हे ठाणे जिल्ह्यातील एक मोठे व्यापारी शहर म्हणून ओळखले जाते. 'आम्ही आधीच वस्तूंच्या खरेदी-विक्रीवर शासनाला वस्तू व सेवा कराच्या (जीएसटी) माध्यमातून कर अदा करत आहोत.त्यात 'यूपीआय'सारख्या सुलभ आणि जलद प्रणालीवर अतिरिक्त शुल्क आकारल्यास त्याचा आर्थिक फटका बसेल,' अशी भीती व्यापाऱ्यांनी व्यक्त केली. 'आजच्या काळात २००० रुपये ही मोठी रक्कम नसून, या निर्णयामुळे व्यापारी पुन्हा रोख व्यवहारांकडे वळण्याची भीती आहे. 'यूपीआय'चा भुर्दंड व्यापाऱ्यांच्या माथी मारू नये, अशी आग्रही मागणी 'चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्री अँड ट्रेड'ने अर्थमंत्र्यांकडे केली. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे यूपीआय व्यवहारांवरील शुल्काचा निर्णय त्वरित मागे घेण्याची मागणी करण्यात आली आहे. व्यापारी आणि ग्राहक या दोघांच्याही आर्थिक हिताचा विचार करून सरकारने या निर्णयाचा



तातडीने पुनर्विचार करावा आणि सणासुदीच्या काळात बाजारपेठेतील व्यवहार सुरळीत होण्यासाठी व्यापारी वर्गाला दिलासा द्यावा. केंद्र सरकारने 'यूपीआय' व्यवहारांवर अतिरिक्त शुल्क (एमडीआर) आकारण्याची घोषणा केल्याने व्यापारी वर्गातून नाराजीचा सूर उमटत आहे. या संभाव्य आर्थिक भाराला विरोध दर्शवण्यासाठी अंबरनाथ व उल्हासनगरातील व्यापाऱ्यांनी गुरुवारपासून दुकानांवरील 'यूपीआय पेमेंट'चे फलक आणि 'क्यूआर कोड' हटवण्यास सुरुवात केली आहे. उल्हासनगर हे ठाणे जिल्ह्यातील एक मोठे व्यापारी शहर म्हणून ओळखले जाते. 'आम्ही आधीच वस्तूंच्या खरेदी-विक्रीवर शासनाला वस्तू व सेवा कराच्या (जीएसटी) माध्यमातून कर अदा करत आहोत. त्यात 'यूपीआय'सारख्या सुलभ आणि जलद प्रणालीवर अतिरिक्त शुल्क आकारल्यास त्याचा आर्थिक फटका बसेल,' अशी भीती व्यापाऱ्यांनी व्यक्त केली. 'आजच्या काळात २००० रुपये ही मोठी रक्कम नसून, या निर्णयामुळे व्यापारी पुन्हा रोख व्यवहारांकडे वळण्याची भीती आहे. 'यूपीआय'चा भुर्दंड व्यापाऱ्यांच्या माथी मारू नये, अशी आग्रही मागणी 'चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्री अँड ट्रेड'ने अर्थमंत्र्यांकडे केली.अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे यूपीआय व्यवहारांवरील शुल्काचा निर्णय त्वरित मागे घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

नवोदय विद्यालयांच्या मुद्द्यावर तामिळनाडूला सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

तीन महिन्यांत जागा निश्चित करण्याचे आदेश; हिंदीच्या मुद्द्यावर केंद्र-राज्य संवादाचा सल्ला

जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली | प्रतिनिधी: तामिळनाडूमध्ये जवाहर नवोदय विद्यालये सुरू करण्याच्या मुद्द्यावर सुरू असलेल्या वादात सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला मोठा धक्का देत, प्रत्येक जिल्ह्यात नवोदय विद्यालयासाठी योग्य जागा निश्चित करण्याच्या पूर्वीच्या निर्देशात हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे. न्यायालयाने तामिळनाडू सरकारला तीन महिन्यांच्या आत प्रत्येक जिल्ह्यात योग्य जागा ओळखण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच नवोदय विद्यालयांच्या भाषाविषयक धोरणावरून निर्माण झालेला वाद केंद्र व राज्य सरकारने चर्चेच्या माध्यमातून सोडवावा, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. तामिळनाडू सरकारने नवोदय विद्यालयांच्या स्थापनेला विरोध करताना राज्याच्या द्विभाषिक धोरणाचा मुद्दा उपस्थित केला आहे. राज्यात तमिळ आणि इंग्रजी या दोन भाषांना प्राधान्य दिले जाते, तर नवोदय विद्यालयांच्या अभ्यासक्रमात तीन भाषांच्या धोरणाचा अवलंब केला जात असल्याने हिंदीला स्थान मिळण्याची शक्यता आहे, अशी भूमिका राज्य सरकारने मांडली आहे. या पार्श्वभूमीवर नवोदय विद्यालयांची स्थापना राज्याच्या विद्यमान भाषाविषयक धोरणाशी विसंगत ठरू शकते, असा युक्तिवाद करण्यात आला. मद्रास उच्च न्यायालयाने तामिळनाडूतील प्रत्येक जिल्ह्यात जवाहर नवोदय विद्यालय सुरू करण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्याचे निर्देश दिल्यानंतर राज्य सरकारने त्या निर्णयाला



सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी १५ डिसेंबर २०२५ रोजी प्रत्येक जिल्ह्यात शाळा उभारण्यासाठी आवश्यक जमीन ओळखण्याचे निर्देश दिले होते. राज्य सरकारने हा आदेश मागे घेण्याची मागणी केली होती. मात्र, १७ सप्टेंबरच्या सुनावणीत न्यायालयाने तो आदेश मागे घेण्यास नकार देत पालनासाठी आणखी तीन महिन्यांची मुदत दिली. 'हिंदी शिकवली जाणार नाही, असे म्हणता येणार नाही' सुनावणीदरम्यान न्यायालयाने तामिळनाडूच्या भाषाविषयक आक्षेपावरही भाष्य केले. न्यायालयाने हिंदीच्या शिक्षणाला पूर्णपणे नकार देता येणार नाही, अशी भूमिका व्यक्त करत राज्य आणि केंद्राने परस्पर संवादातून मार्ग काढण्याचे सुचवले. तसेच केंद्राकडून येणारी शैक्षणिक व्यवस्था राज्याच्या विद्यमान शिक्षणव्यवस्थेचा दर्जा कमी करेल, असे गृहित धरू नये, असेही न्यायालयाने नमूद केले. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार, नवोदय विद्यालये ही केंद्र सरकारच्या अर्थसहाय्याने चालणारी निवासी शाळांची व्यवस्था असून, ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हा तिचा प्रमुख उद्देश आहे. शाळांच्या स्थापनेसाठी राज्याकडून जमीन उपलब्ध करून देणे अपेक्षित असून, बांधकाम व शैक्षणिक व्यवस्थेचा खर्च केंद्राकडून केला जातो. तामिळनाडू सरकारने प्रत्येक जिल्ह्यात सुमारे ३० एकर जमीन आवश्यक असल्याचा मुद्दाही उपस्थित केला. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने सध्या जमीन ताब्यात घेण्याचे निर्देश दिलेले नसून योग्य सरकारी जमीन ओळखण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिल्याचे स्पष्ट केले. या प्रकरणात केंद्र आणि तामिळनाडू सरकारच्या प्रतिनिधींनी भाषाविषयक तसेच शाळांच्या स्थापनेशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा सुरू ठेवावी, असे न्यायालयाने सांगितले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी १४ डिसेंबर २०२६ रोजी होणार आहे.तामिळनाडूमध्ये जवाहर नवोदय विद्यालये सुरू करण्याच्या मुद्द्यावर सुरू असलेल्या वादात सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला मोठा धक्का देत, प्रत्येक जिल्ह्यात नवोदय विद्यालयासाठी योग्य जागा निश्चित करण्याच्या पूर्वीच्या निर्देशात हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे.

नामशेष होत असलेल्या सारस पक्ष्यांच्या संवर्धनाचे व्रत

जन सम्राट टाईम्स

नागपूर | प्रतिनिधी: महाराष्ट्रातून जवळपास नामशेष होण्याच्या मार्गावर अलेल्या सारस पक्ष्यांच्या संवर्धनाला गोंदियातील 'सेवा' (Sustaining Environment and Wildlife Assemblage) संस्थेच्या दोन दशकांच्या प्रयत्नांमुळे नवी आशा मिळाली आहे. २००४-०५मध्ये अवघ्या चार सारस पक्ष्यांपासून सुरू झालेला हा प्रवास आता ३५ पर्यंत पोहोचला आहे. मात्र, ही संख्या टिकवून वाढविण्यासाठी सुरू असलेल्या संवर्धन कार्याच्या भरारीला अर्थबळाची गरज आहे. गेल्या दोन दशकांपासून शेतकरी, ग्रामस्थ आणि स्वयंसेवकांना बरोबर घेऊन 'सेवा' संस्थेने सारस संवर्धनाची मोहीम राबवली आहे. कार्यकर्त्यांनी अनेकदा स्वखर्चातून हे काम पुढे नेले. मात्र निधीअभावी संवर्धनाच्या कामात अडथळे येत आहेत.'सर्वकार्येषु सर्वदा' उपक्रमातून 'सेवा'च्या कार्याला हातभार लावण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गोंदिया जिल्ह्यातील सारसांचा अधिवास शोधणे, त्यांच्या जोड्या व घरट्यांची नोंद करणे आणि त्यांना असलेले धोके ओळखणे, या कामातून संस्थेच्या संवर्धन मोहिमेला सुरुवात झाली. सारस भातशेतात घरटी करीत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होते. त्यामुळे संस्थेने 'सारस मित्र' तयार करून घरट्यांचे संरक्षण करण्याबरोबरच शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणारा मोबदला मिळवून देण्याचे काम सुरू केले. सध्या संरक्षित सारसाच्या घरट्यामागे शेतकऱ्याला ३५ हजार रुपयांचा मोबदला मिळतो.'सारस फ्रेंडली राईस' या उपक्रमातून सुमारे ८० एकर क्षेत्रात सेंद्रिय धानशेतीला प्रोत्साहन दिले जात आहे. गोंदियासह भंडारा आणि मध्य प्रदेशातील बालाघाट येथेही संस्थेचे संवर्धन कार्य सुरू आहे. होणारे मृत्यू, कीटकनाशकांचा वापर, मोकाट कुत्र्यांचा धोका आणि अधिवासाचा ऱ्हास, ही सारस पक्ष्यांसमोरील प्रमुख आव्हाने आहेत. या धोक्यांपासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी 'सेवा' संस्था शेतकरी, स्वयंसेवक आणि ग्रामस्थांच्या साथीने काम करत आहे.

आदित्य ठाकरेंना 500 कोटींची मानहानी नोटीस

वडील सतीश सालियन यांची कारवाई; अनिल देशमुख यांनाही नोटीस

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी : दिशा सालियन यांच्या मृत्यू प्रकरणात नव्या घडामोडींना वेग आला आहे. दिशा सालियन यांचे वडील सतीश सालियन यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांना ५०० कोटी रुपयांची मानहानीची कायदेशीर नोटीस पाठवली आहे. माजी महाराष्ट्राचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनाही नोटीस पाठवण्यात आल्याचे वृत्त आहे. सतीश सालियन यांनी आपल्या मुलीच्या मृत्यूची नव्याने चौकशी करण्याची मागणी केल्यानंतर आपल्याबाबत करण्यात आलेल्या कथित वक्तव्यांमुळे बदनामी झाल्याचा दावा नोटीसमध्ये करण्यात आला आहे. 'द इंडियन एक्स्प्रेस'ने याबाबत वृत्त दिले आहे. दिशा सालियन यांचा ८ जून २०२० रोजी मुंबईतील मालाड परिसरातील एका निवासी इमारतीवरून पडून मृत्यू झाला होता. त्यांच्या मृत्यूनंतर काही दिवसांनी, १४ जून रोजी अभिनेता सुशांत सिंह राजपूत यांचा मृत्यू झाला. या दोन घटनांचा परस्पर संबंध असल्याचे दावे त्यानंतर सार्वजनिक चर्चेत आले. उच्च न्यायालयात नव्या तपासाची मागणी सतीश सालियन यांनी मुलीच्या मृत्यूची नव्याने चौकशी करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने २ सप्टेंबर २०२६ रोजी सीबीआयला एफआयआर नोंदवून तपास करण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने मात्र तपासात पुरेसे साहित्य समोर येईपर्यंत कोणत्याही व्यक्तीला आरोपी मानू नये, असे स्पष्ट केले होते. यानंतर सीबीआयने १४ सप्टेंबर रोजी दिशा सालियन मृत्यू प्रकरणात एफआयआर नोंदवला. एफआयआरमध्ये आदित्य ठाकरे यांच्यासह काही व्यक्तींच्या भूमिकेचा तपास करण्याचा उल्लेख असल्याचे वृत्त आहे. मात्र, एफआयआरमध्ये नाव किंवा भूमिकेचा तपास होणे आणि संबंधित व्यक्ती आरोपी



असल्याचे सिद्ध होणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार तपासादरम्यान पुरावे समोर आल्यानंतरच पुढील कायदेशीर कारवाईचा निर्णय होणार आहे. 'द इंडियन एक्स्प्रेस'च्या वृत्तानुसार, सतीश सालियन यांच्या कायदेशीर नोटीसमध्ये आदित्य ठाकरे यांच्या कायदेशीर प्रतिनिधींनी न्यायालयीन कार्यवाहीदरम्यान सतीश सालियन यांचा वापर त्यांना त्रास देण्यासाठी केला जात असल्याचा दावा केल्याचा उल्लेख आहे. हे आरोप खोटे, बिनबुडाचे आणि बदनामीकारक असल्याचे सतीश सालियन यांनी नोटीसमध्ये म्हटले आहे. आपण केवळ आपल्या मुलीच्या मृत्यूची कायदेशीर चौकशी व्हावी यासाठी न्यायालयात गेल्याचे त्यांचे म्हणणे आहे. आदित्य ठाकरेंकडून आरोप फेटाळले दरम्यान, आदित्य ठाकरे यांनी दिशा सालियन यांच्याशी कोणतीही ओळख नसल्याचे किंवा आपण त्यांना कधी भेटलो नसल्याचे म्हटले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही वर्षांपासून राजकीय व वैयक्तिक हेतूने त्यांचे नाव या प्रकरणाशी जोडले जात आहे. सीबीआयने नव्याने सुरू केलेल्या तपासात कोणताही राजकीय हस्तक्षेप नसावा आणि तपास यंत्रणांना स्वतंत्रपणे काम करू द्यावे, अशी भूमिकाही त्यांनी मांडली आहे. दरम्यान, सीबीआयच्या नव्या तपासामुळे २०२० मधील दिशा सालियन यांच्या मृत्यूच्या परिस्थितीबाबत पुन्हा चौकशी सुरू झाली आहे. तपासादरम्यान कोणते पुरावे समोर येतात आणि त्याआधारे पुढे कोणती कायदेशीर कारवाई होते, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. व्यक्तींच्या भूमिका यांना अंतिम निष्कर्ष मानता येणार नाही. दिवंगत सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन यांच्या मृत्यू प्रकरणात नव्या घडामोडींना वेग आला आहे. दिशा सालियन यांचे वडील सतीश सालियन यांनी शिवसेना५०० कोटी रुपयांची मानहानीची कायदेशीर नोटीस पाठवली आहे. माजी महाराष्ट्राचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनाही नोटीस पाठवण्यात आल्याचे वृत्त आहे. सतीश सालियन यांनी आपल्या मुलीच्या मृत्यूची नव्याने चौकशी करण्याची मागणी केल्यानंतर आपल्याबाबत करण्यात आलेल्या कथित वक्तव्यांमुळे बदनामी झाल्याचा दावा नोटीसमध्ये करण्यात आला आहे. 'द इंडियन एक्स्प्रेस'ने याबाबत वृत्त दिले आहे. दिशा सालियन यांचा ८ जून २०२० रोजी मुंबईतील मालाड परिसरातील एका निवासी इमारतीवरून पडून मृत्यू झाला होता. त्यांच्या मृत्यूनंतर काही दिवसांनी, १४ जून रोजी अभिनेता सुशांत सिंह राजपूत यांचा मृत्यू झाला. या दोन घटनांचा परस्पर संबंध असल्याचे दावे त्यानंतर सार्वजनिक चर्चेत आले. उच्च न्यायालयात नव्या तपासाची मागणी सतीश सालियन यांनी मुलीच्या मृत्यूची नव्याने चौकशी करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने २ सप्टेंबर २०२६ रोजी सीबीआयला एफआयआर नोंदवून तपास करण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने मात्र तपासात पुरेसे साहित्य समोर येईपर्यंत कोणत्याही व्यक्तीला आरोपी मानू नये, असे स्पष्ट केले होते.

विद्याताई धनके यांची मराठा युवा महासंघाच्या महानगर महिला आघाडी अध्यक्षपदी नियुक्ती



जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी: छावा मराठा युवा महासंघाच्या जळगाव महानगर महिला आघाडीच्या अध्यक्षपदी हरी विठ्ठल नगर येथील विद्याताई सुभाष धनके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष अमोल भाऊ कोल्हे यांच्या हस्ते विद्याताई धनके यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आणि एकमताने विद्याताई धनके यांची जळगाव महानगर महिला आघाडी अध्यक्षपदी निवड करण्यात आली. नियुक्तीनंतर उपस्थित पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी छावा मराठा युवा महासंघाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संघटनेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण, सामाजिक उपक्रम आणि समाजहिताचे कार्य अधिक प्रभावीपणे करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.छावा मराठा युवा महासंघाच्या जळगाव महानगर महिला आघाडीच्या अध्यक्षपदी हरी विठ्ठल नगर येथील विद्याताई सुभाष धनके यांची नियुक्ती करण्यात आली आहे.उपाध्यक्ष अमोल भाऊ कोल्हे यांच्या हस्ते विद्याताई धनके यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आणि एकमताने विद्याताई धनके यांची जळगाव महानगर महिला आघाडी अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

बांगलादेशही आता कांदा निर्यातदार; श्रीलंकेला करणार निर्यात



जन सम्राट टाईम्स

निफाड:| प्रतिनिधी : भारताकडून मोठ्या प्रमाणात कांदा आयात करणाऱ्या बांगलादेशच्या कांदा व्यापाराचे चित्र आता बदलताना दिसत आहे. देशांतर्गत कांदा उत्पादनात वाढ झाल्याने बांगलादेश अतिरिक्त कांदा श्रीलंकेच्या बाजारपेठेत निर्यात करण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे भारतीय कांदा उत्पादकांसह निर्यातदारांसमोर भविष्यात नवे आव्हान निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. सन २०२३-२४मध्ये भारताने बांगलादेशला ७.२४ लाख टन कांदा निर्यात केला होता. भारताच्या त्या वर्षातील एकूण १७.१७ लाख टन कांदा निर्यातीपैकी बांगलादेशचा वाटा ४२ टक्के होता. त्यामुळे बांगलादेश ही भारतीय कांद्यासाठी अत्यंत महत्त्वाची पारंपरिक बाजारपेठ राहिली आहे. मात्र, आता बांगलादेशने कांदा उत्पादनात वाढ केली असून, देशांतर्गत गरज भागवून उरलेला कांदा परदेशी बाजारपेठेत पाठविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

बांगलादेशने श्रीलंकेला कांदा आणि बटाटा निर्यात करण्याची इच्छा व्यक्त केल्याचे वृत्त समोर आले आहे. उत्पादकांना चांगला भाव मिळावा आणि द्विपक्षीय व्यापार वाढावा, हा त्यामागील उद्देश असल्याचे सांगितले जात आहे. भारतीय कांदा निर्यातदारांकडून केंद्र सरकारच्या निर्यात धोरणातील वारंवार बदलांमुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता आहे. २०२३मध्ये भारताने कांदा निर्यातीवर ४० टक्के शुल्क लावले होते. त्यानंतर डिसेंबर २०२३ ते मे २०२४ या काळात निर्यातबंदीही लागू करण्यात आली. नंतर निर्यात पुन्हा सुरू करताना किमान निर्यात मूल्य आणि शुल्कासारख्या उपाययोजना करण्यात आल्या. मार्च २०२५मध्ये केंद्राने २० टक्के निर्यात शुल्क हटविण्याची घोषणा केली. भारतीय कांदा बाजारपेठ धोक्यात? बांगलादेशाच्या उत्पादनक्षमतेत वाढ होऊन तो भविष्यात नियमित कांदा निर्यात दार बनला, तर दक्षिण आशियातील कांदा व्यापाराचे समीकरण बदलू शकते. विशेषतः श्रीलंका, बांगलादेश आणि इतर आशियाई बाजारपेठांमध्ये भारतीय कांद्याला बांगलादेशकडून स्पर्धा निर्माण होऊ शकते. भारतीय कांद्याची निर्यात महाराष्ट्रातील नाशिक, लासलगाव, पिंपळगाव, येवला, चांदवड आदी बाजारपेठांशी जोडलेली आहे. त्यामुळे परदेशी मागणीत घट झाली किंवा पर्यायी पुरवठादार आले, तर त्याचा परिणाम देशांतर्गत बाजारभावावरही होऊ शकतो. केंद्र सरकारने निर्यातदार, व्यापारी आणि उत्पादक यांच्याशी चर्चा करून दीर्घकालीन, स्थिर आणि बाजारपेठाभिमुख कांदा निर्यात धोरण आखावे, अशी मागणी जोर धरत आहे.भारताकडून मोठ्या प्रमाणात कांदा आयात करणाऱ्या बांगलादेशच्या कांदा व्यापाराचे चित्र आता बदलताना दिसत आहे. देशांतर्गत कांदा उत्पादनात वाढ झाल्याने बांगलादेश अतिरिक्त कांदा श्रीलंकेच्या बाजारपेठेत निर्यात करण्याच्या तयारीत आहे.

धुळ्यात अन्न सुरक्षा विभागाची कारवाई; ३.२६ लाखांचा संशयित साठा जप्त!

जन सम्राट टाईम्स



धुळे | प्रतिनिधी: अन्न सुरक्षा व स्वच्छतेच्या अनुषंगाने धुळे जिल्ह्यात विविध अन्न आस्थापनांची तपासणी करण्यात आली. अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार राबविण्यात आलेल्या या मोहिमेत धुळे शहरातील कुमार नगर परिसरातील दोन आस्थापनांवर कारवाई करून ३ लाख २६ हजार रुपयांहून अधिक किमतीचा संशयित अन्नसाठा जप्त करण्यात आला. धुळे शहरातील कुमार नगर, साक्री रोड येथील मे. गायत्री ट्रेडर्स या आस्थापनाची तपासणी करण्यात आली. यावेळी गाईचे व म्हशीचे तूप या अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. संशयाच्या आधारे संबंधित तुपाचा ४६३ किलो साठा जप्त करण्यात आला असून त्याची किंमत ३ लाख ८०० रुपये असल्याचे अन्न सुरक्षा विभागाने सांगितले. तसेच कुमार नगर, साक्री रोड येथील मे. रियल गृह उद्योग या आस्थापनाचीही तपासणी करण्यात आली. यावेळी बुंदी व बुंदीचे लाडू या अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. संशयाच्या आधारे १५८ किलो अन्नसाठा जप्त करण्यात आला असून त्याची किंमत २५ हजार २०० रुपये आहे. प्रयोगशाळेच्या अहवालानंतर पुढील कारवाई कारवाईदरम्यान संकलित करण्यात आलेले प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार अन्न सुरक्षा कायद्यातील तरतुदींनुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे विभागाकडून स्पष्ट करण्यात आले. ही कारवाई सहायक आयुक्त (अन्न) धुळे गोपाल माहोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी आनंद पवार, अरविंद राऊत आणि मंगेश भावसार यांनी केली. नागरिकांना सुरक्षित, गुणवत्तापूर्ण आणि भेसळमुक्त अन्न उपलब्ध करून देण्यासाठी अन्न सुरक्षा विभागामार्फत जिल्ह्यात अशा प्रकारच्या तपासण्या, नमुना संकलन आणि आवश्यक कायदेशीर कार्यवाही सातत्याने सुरू राहणार असल्याचे विभागाने सांगितले.अन्न सुरक्षा व स्वच्छतेच्या अनुषंगाने धुळे जिल्ह्यात विविध अन्न आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार राबविण्यात आलेल्या या मोहिमेत धुळे शहरातील कुमार नगर परिसरातील दोन आस्थापनांवर कारवाई करून ३ लाख २६ हजार रुपयांहून अधिक किमतीचा संशयित अन्नसाठा जप्त करण्यात आला. धुळे शहरातील कुमार नगर, साक्री रोड येथील मे. गायत्री ट्रेडर्स या आस्थापनाची तपासणी करण्यात आली. यावेळी गाईचे व म्हशीचे तूप या अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. संशयाच्या आधारे संबंधित तुपाचा ४६३ किलो साठा जप्त करण्यात आला.

नवागड प्रशालेत मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात

ध्वजारोहणासह देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण

जन सम्राट टाईम्स



परभणी । प्रतिनिधी: श्रीमती रतनबाई चंद्रकांतराव सोनटक्के प्रशाला, नवागड येथे ७८ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रशालेचे मुख्याध्यापक राजेंद्र लुंगाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत मराठवाडा मुक्ती संग्रामातील हुतात्मे व स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन केले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी अहाळे सर, त्रिमुखे सर, गडेकर, बाभळीचे सरपंच विठ्ठल पंढरे, उपसरपंच मारोती उघडे, पोलीस पाटील उत्तम उघडे, शब्बीर भाई, सिरसागर सर, सदाशिव आनेराव, अंभोरे आदी उपस्थित होते. यावेळी प्रशालेतील निवडक विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. कु. धनश्री देशमुख, कु. माया धोत्रे तसेच इयत्ता आठवीच्या गीतमंचाने देशभक्तीपर गीते सादर केली. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे महत्त्व सांगताना गणेश शेळके, कु. समीक्षा आनेराव आणि कु. आरती भंडारवाड यांनी मनोगत व भाषणे केली. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आयोजित निबंध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना यावेळी बक्षिसांचे वितरण करण्यात आले. आर्यनंदी वाचनालयाच्या वतीने ही बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमात सोनटक्के सर, विठ्ठल पंढरे आणि मुख्याध्यापक राजेंद्र लुंगाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. क्रांती आहेर आणि कु. श्रद्धा राऊत यांनी केले. कार्यक्रमानंतर सोनटक्के सर यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास बाभळी ग्रामचे सरपंच विठ्ठलराव पंढरे, उपसरपंच मारोती उघडे, पोलीस पाटील उत्तम उघडे, पालक-शिक्षक संघाचे सदस्य शब्बीर भाई, नारायण आनेराव, सदाशिव आणेराव, क्षीरसागर सर, पालक, माता-भगिनी, शिक्षक व कर्मचारीवृंद तसेच माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्रीमती रतनबाई चंद्रकांतराव सोनटक्के प्रशाला, नवागड येथे ७८ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. आयोजित कार्यक्रमात प्रशालेचे मुख्याध्यापक राजेंद्र लुंगाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत मराठवाडा मुक्ती संग्रामातील हुतात्मे व स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन केले.

नवनियुक्त उपनगराध्यक्षा सौ. रुपाली देवरे यांचा सत्कार

जन सम्राट टाईम्स



धरणगाव | प्रतिनिधी: धरणगाव नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी महायुतीच्या नगरसेविका सौ. रुपाली पवन देवरे यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल संत सावता माळी युवक संघ महाराष्ट्र राज्य या सामाजिक संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सौ. रुपाली देवरे यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. तसेच त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी संत सावता माळी युवक संघ महाराष्ट्र राज्याचे विभागीय अध्यक्ष विनायक महाजन, तालुका अध्यक्ष दिनेश महाजन, तसेच जॉनी महाजन, भूषण महाजन, योगेश महाजन, शुभम महाजन यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.महायुतीच्या नगरसेविका सौ. रुपाली पवन देवरे यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल संत सावता माळी युवक संघ महाराष्ट्र राज्य या सामाजिक संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

नाशिक जिल्ह्यात रिमझिम! सरासरी 11.2 मिमी सरी!



जन सम्राट टाईम्स

नाशिक| प्रतिनिधी: जिल्ह्यात अनेक दिवसांच्या खंडानंतर पावसाने पुन्हा हजेरी लावली आहे. रविवारी सकाळी साडेआठपर्यंतच्या २४ तासांत जिल्ह्यात सरासरी ११.२ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर सोमवारी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला असून, मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. हवामान विभागाने रविवारी जिल्ह्यासाठी 'यलो', तर घाटमाथ्यासाठी 'ऑरेंज अलर्ट' दिला होता. शनिवारी दिवसभर जिल्ह्यातील सर्व १५ तालुक्यांमध्ये कमी-अधिक प्रमाणात पाऊस झाला. सुरगाणा तालुक्यात अनेक ठिकाणी मुसळधार पावसाने हजेरी लावली. येथे सर्वाधिक ३९.१ मिमी पाऊस नोंदविला गेला. दिंडोरीत २९.१ मिमी, त्र्यंबकेश्वरमध्ये २४.९ मिमी, पेठमध्ये १५.६ मिमी, कळवणमध्ये १५.४ मिमी, तर बागलाणमध्ये ११.३ मिमी पाऊस झाला. नाशिक तालुक्यातही १३.१ मिमी पावसाची नोंद झाली. रविवारी ग्रामीण भागात काही ठिकाणी पावसाचा जोर कायम होता. शहरात १६.८ मिमी पाऊस नाशिक शहरात रविवारी सकाळी साडेआठपर्यंतच्या २४ तासांत १६.८ मिमी पावसाची नोंद झाली. शनिवारी सायंकाळी उपनगरांमध्ये पावसाचा जोर वाढला होता. पहाटेही पाऊस झाल्याने अनेक दिवसांनंतर शहरात तुलनेने चांगला पाऊस नोंदविला गेला. रविवारी 'यलो अलर्ट' असला, तरी शनिवारच्या तुलनेत पावसाचा जोर कमी राहिला. दिवसभर पावसाची भुरभुर सुरू असल्याने सूर्यदर्शन झाले नाही. सायंकाळी साडेपाचपर्यंत शहरात आणखी १.१ मिमी पावसाची नोंद झाली. जिल्ह्यात अनेक दिवसांच्या खंडानंतर पावसाने पुन्हा हजेरी लावली आहे. रविवारी सकाळी साडेआठपर्यंतच्या २४ तासांत जिल्ह्यात सरासरी ११.२ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर सोमवारी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला असून, मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. हवामान विभागाने रविवारी जिल्ह्यासाठी 'यलो', तर घाटमाथ्यासाठी 'ऑरेंज अलर्ट' दिला होता.

हिंगोलीत ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाचा जिल्हास्तरीय मेळावा उत्साहात

संजीव निकम यांच्या मार्गदर्शनाखाली मेळावा; प्रलंबित सेवा विषयांवर प्रशासनासोबत सकारात्मक चर्चा

जन सम्राट टाईम्स

पारोळा/हिंगोली । प्रतिनिधी : हिंगोली जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाचा जिल्हास्तरीय मेळावा १५ सप्टेंबर २०२६ रोजी साई रिसॉर्ट, अकोला बायपास, हिंगोली येथे उत्साहात संपन्न झाला. महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन डीएनई १३६ चे राज्याध्यक्ष संजीव निकम यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी मराठवाडा विभागीय सचिव सखाराम काशिद, बीड जिल्हाध्यक्ष मधुकर शेळके आणि परभणी जिल्हाध्यक्ष ज्ञानोबा दुधाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. हिंगोली जिल्हा परिषद प्रशासन आणि ग्रामपंचायत अधिकारी संवर्गातील पदाधिकारी यांच्यात मागील काही महिन्यांपासून विविध सेवा विषयक बाबींवर मतभेद व सुसंवादाचा अभाव असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. बदली प्रक्रिया, प्रशासकीय कारवाई, ग्रामपंचायतींच्या भेटीदरम्यान होणारी कारवाई तसेच प्रलंबित सेवा विषयक प्रश्नांची सोडवणूक होत नसल्याचा दावा संघटनेने केला आहे. या पार्श्वभूमीवर हिंगोली जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी युनियन डीएनई १३६ चे जिल्हाध्यक्ष दिलीप पांढरे पाटील आणि सरचिटणीस राजेश किलचे यांनी



जिल्हा कार्यकारणी व सभासदांना विश्वासात घेऊन २० ऑगस्ट २०२६ पासून जिल्हा परिषद प्रशासनाच्या विरोधात असहकार आंदोलन सुरू केले होते. या आंदोलनाची दखल प्रशासनाने घ्यावी आणि प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधावे, या उद्देशाने जिल्हास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. सभासदांच्या अडीअडचणी जाणून घेत मार्गदर्शन राज्याध्यक्ष संजीव निकम यांनी मार्गदर्शनापूर्वी उपस्थित ग्रामपंचायत अधिकारी सभासदांच्या समस्या व अडीअडचणी जाणून घेतल्या. त्यानंतर मागील चार वर्षांत राज्य युनियनने संवर्गाच्या हितासाठी राज्यस्तरावर केलेल्या कार्याची माहिती त्यांनी दिली. ग्रामसभा संख्या तसेच राज्यस्तरावरून मार्गी लावण्यात येणाऱ्या विविध नवीन विषयांची माहितीही त्यांनी उपस्थितांना दिली. याशिवाय सर्वसामान्य सभासद, तालुका अध्यक्ष व सचिव, कार्यकारणी सदस्य, जिल्हाध्यक्ष व सरचिटणीस, विभागीय पदाधिकारी आणि राज्य पदाधिकारी यांच्या अधिकार व कर्तव्यांबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. बदलत्या काळात ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत स्तरावर स्मार्टवर्क करण्याची गरज असून, ग्रामपंचायतीचे १ ते ३३ नमुने तसेच इतर अभिलेखे अद्ययावत ठेवणे आवश्यक असल्याचे निकम यांनी सांगितले. यावेळी मराठवाडा विभागीय सचिव सखाराम काशिद आणि बीड जिल्हाध्यक्ष मधुकर शेळके यांनीही मार्गदर्शन केले. प्रशासनासोबत सविस्तर चर्चा मेळाव्यादरम्यानच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड यांचा संदेश प्राप्त झाला. राज्याध्यक्ष आणि जिल्हा कार्यकारणीच्या पदाधिकाऱ्यांना प्रलंबित सेवा विषयांवर चर्चेसाठी त्याच दिवशी बोलावण्यात आले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

जळगाव जिल्ह्यात ‘सेवा संकल्प अभियानाला’ सुरुवात

विविध स्पर्धा आणि जनजागृतीपर उपक्रमांनी ग्रामीण भागात उत्साहाचे वातावरण

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: भारतासह राज्यभरात दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या ‘सेवा संकल्प अभियानाला’ जळगाव जिल्ह्यात उत्साहात सुरुवात झाली. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील सर्व १५ तालुक्यांमध्ये पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर विविध लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात आले.

स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, शासकीय सेवा, शिक्षण, पोषण आणि जनजागृतीला या अभियानात प्राधान्य देण्यात आले. ‘सेवेतून समाधान आणि लोकसहभागातून ग्रामीण विकास’ हा संदेश घेऊन सुरू झालेल्या या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय दाखले व सेवा उपलब्ध करून देण्याबरोबरच ग्रामस्तरावर स्वच्छता, वृक्षलागवड, स्पर्धा, सभा आणि जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विविध उपक्रमांसाठी जिल्हा परिषद विभागप्रमुखांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी भुसावळ तालुक्यातील खंडाळा व वांजोळा येथे भेट देऊन अभियानाच्या कामांची पाहणी केली. तालुकानिहाय उपक्रम

जळगाव : तालुक्यात विविध दाखल्यांच्या वाटपाची विशेष मोहीम राबविण्यात आली. कानळदा येथे पुरातन विहिरीची स्वच्छता करून ऐतिहासिक जलस्रोतांच्या संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

यावेळी गटविकास अधिकारी चंद्रकांत बोढरे उपस्थित होते. जामनेर : पहूरपेठ येथे ‘एक दिवस गावासाठी’ या संकल्पनेतून स्वच्छता व वृक्षलागवड करण्यात आली. नागरिकांना जन्म व विवाह दाखल्यांचे वितरण करण्यात आले. गटविकास अधिकारी



एस. एस. इंगळे उपस्थित होते. एरंडोल : तालुक्यातील ५२ ग्रामपंचायतींमध्ये अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालये, जिल्हा परिषद शाळा, आरोग्य उपकेंद्रे व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या स्वच्छतेवर भर देण्यात आला. ‘आपले सरकार सेवा केंद्रा’च्या माध्यमातून विविध दाखले वितरित करण्यात आले. गटविकास अधिकारी सौरभ निकम उपस्थित होते. धरणगाव : ग्रामपंचायत स्तरावर सेवा संकल्प सभा व वृक्षलागवड करण्यात आली. शाळा आणि अंगणवाडी केंद्रांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. VB-G RAM G अंतर्गत ‘जलतारा’सह विविध विकासकामांना प्रारंभ करण्यात आला. गटविकास अधिकारी सागर कोल्हे उपस्थित होते. चाळीसगाव : ग्रामपंचायतींमध्ये विशेष सभा घेण्यात आल्या. शाळांमध्ये चित्रकला, रांगोळी व स्वच्छता उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. नागरिकांना विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. गटविकास अधिकारी एस. टी. मोरे उपस्थित होते. पाचोरा : पंचायत समिती परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वच्छता तसेच प्लास्टिकमुक्तीची शपथ घेतली.

गटविकास अधिकारी के. बी. अंजने यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. भडगाव : पंचायत समिती आणि ग्रामपंचायत स्तरावर नागरिककेंद्रित सेवा तसेच जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले. पारोळा : ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावर विविध लोकाभिमुख उपक्रम राबवून नागरिकांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात आला. गटविकास अधिकारी भूषण कदम यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. अमळनेर : शाळा, अंगणवाडी व ग्रामपंचायत परिसरात रांगोळीच्या माध्यमातून अभियानाचा संदेश देण्यात आला. पोषण माह सप्ताहाची शपथ घेण्यात आली. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांसाठी महाडीबीटी नोंदणी शिबिर सुरू करण्यात आले. ‘जलतारा’ कामांनाही प्रारंभ झाला. गटविकास अधिकारी एन. आर. पाटील व ग्रामस्थ उपस्थित होते. चोपडा : ग्रामस्थांच्या सभा घेण्यात आल्या. चित्रकला व रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विवाह नोंदणी प्रमाणपत्र वाटपाची विशेष मोहीमही राबविण्यात आली. गटविकास अधिकारी अंजली बर्गे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावल : स्वच्छता व दाखले वाटपासोबतच चित्रकला, रांगोळी तसेच पोषक खाद्यपदार्थांच्या सजावट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. गटविकास अधिकारी मंजुश्री गायकवाड उपस्थित होत्या. रावेर : विविध ग्रामपंचायतींच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात दाखले वाटप करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये आयोजित चित्रकला स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विनोद मेढे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. मुक्ताईनगर : पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थांच्या सहभागातून स्वच्छता उपक्रम राबविण्यात आले. नागरिकांना विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

१६७ विलेपार्ले विधानसभा: BLO श्री विजयकुमार पाटील यांचे कर्तव्यनिष्ठ कार्य, BLA श्री शंकर सरोज यांची साथ

जन सम्राट टाईम्स

मुंबई, । (प्रतिनिधी): १६७ विलेपार्ले विधानसभा मतदारसंघात भारत निवडणूक आयोगाच्या मतदार यादी संबंधित कामांत BLO म्हणून श्री विजयकुमार पाटील हे अत्यंत जबाबदारीने आणि पारदर्शक पद्धतीने कार्य करत आहेत. या कार्यात त्यांना BLA श्री शंकर सरोज यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. आजच्या कामादरम्यान दोघांनी एकत्रितपणे मतदार यादीचे दस्तऐवज तपासले, पडताळणी केली आणि संबंधित नोंदी व्यवस्थित केल्या. फोटोमध्ये दिसत असलेल्या ठिकाणी रस्त्यावरच कागदपत्रांची पडताळणी करताना दोघेही कर्तव्यावर असल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या या समन्वयामुळे आणि मेहनतीमुळे मतदार यादी अचूक ठेवण्याचे काम वेगाने सुरू आहे. स्थानिक नागरिक, पदाधिकारी आणि मान्यवरांनी श्री विजयकुमार



पाटील आणि श्री शंकर सरोज यांच्या या कार्याचे कौतुक केले असून, लोकशाही मजबूत करण्यासाठी त्यांचे हे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगण्यात आले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

‘सेवा संकल्प अभियान’ रथाचे जिल्हाधिकारी व आमदारांच्या हस्ते उद्घाटन



जन सम्राट टाईम्स

धुळे | प्रतिनिधी : आदिवासी भागातील नागरिकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती मिळावी आणि पात्र लाभार्थ्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी एकात्मिक आदिवासी प्रकल्प विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या ‘सेवा संकल्प अभियान २०२६’ रथाचे जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते आणि साक्री विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मंजुळा गावित यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते आणि आमदार मंजुळा गावित यांनी हिरवा झेंडा दाखवून अभियान रथाला रवाना केले. दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत हा रथ जिल्ह्यातील विविध आदिवासी भागात फिरणार असून, शासनाच्या विविध योजनांची माहिती, पात्रता, लाभ घेण्याची प्रक्रिया तसेच उपलब्ध सुविधांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. आदिवासी समाजातील पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देणे, योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचविणे आणि नागरिकांना विविध शासकीय विभागांशी जोडणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. अभियान रथाच्या माध्यमातून दुर्गम व आदिवासी भागातील नागरिकांपर्यंत थेट माहिती पोहोचविण्यात येणार असल्याने योजनांच्या प्रभावी जनजागृतीस मदत होणार आहे. या अभियानादरम्यान नागरिकांना विविध विभागांच्या कल्याणकारी योजनांची माहिती देतानाच पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, याबाबतही मार्गदर्शन केले जाणार आहे. उद्घाटनप्रसंगी साक्री विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मंजुळा गावित, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, एकात्मिक आदिवासी प्रकल्प विभागाचे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, सहाय्यक प्रकल्प अधिकारी पवन सोनवणे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके, भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ. अजित पाठक, जिल्हा रुग्णालयाचे डॉ. रवींद्र सोनवणे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. आदिवासी भागातील नागरिकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती मिळावी आणि पात्र लाभार्थ्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी एकात्मिक आदिवासी प्रकल्प विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या ‘सेवा संकल्प अभियान २०२६’ रथाचे जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते आणि साक्री विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मंजुळा गावित यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात उद्घाटन करण्यात आले.

जळगाव जिल्हा बॅडमिंटन चॅम्पियनशिप २०२६ उत्साहात, १७१ खेळाडूंचा सहभाग

विविध वयोगटांत चुरशीच्या लढती

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: जळगाव जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन व जैन स्पोर्ट्स अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच जैन इरिगेशन सिस्टीम्स लिमिटेड, जळगाव यांच्या प्रायोजकत्वाखाली आयोजित ‘जळगाव जिल्हा बॅडमिंटन चॅम्पियनशिप २०२६’ स्पर्धेला खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दि. ११ ते १३ सप्टेंबरदरम्यान जळगाव जिल्हा क्रीडा संघाच्या बॅडमिंटन हॉलमध्ये झालेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधील तब्बल १७१ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. जळगावचे ज्येष्ठ बॅडमिंटनपटू स्व. अविनाश दामले यांच्या पुण्यतिथी स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत ९, ११, १३, १५, १७ व १९ वर्षांखालील मुला-मुलींच्या एकेरी व दुहेरी गटांसह खुल्या गटातील पुरुष व महिला एकेरी, दुहेरी, मिश्र दुहेरी तसेच ३५ वर्षांवरील गटातील सामने घेण्यात आले. जळगाव, चाळीसगाव, भुसावळ, जामनेर, एरंडोल, पाचोरा, भडगाव, वरणगाव आणि चोपडा या तालुक्यांतील खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेतला. स्पर्धेतील विजेते व उपविजेत्या खेळाडूंना जैन इरिगेशनच्या वतीने आकर्षक चषक, सुवर्ण व रजत पदक तसेच प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. बक्षीस वितरण समारंभास जळगाव जिल्हा क्रीडा संघाचे अध्यक्ष रजनीकांत कोठारी, राष्ट्रीय खेळाडू ब्रिजेश गौर, जैन स्पोर्ट्स अकॅडमीचे क्रीडा समन्वयक अरविंद देशपांडे, अमोल दामले, जळगाव जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव विनीत जोशी, सदस्य शेखर जाखेटे आणि प्रशिक्षिका दीपिका ठाकूर उपस्थित होते. असा आहे निकाल ९ वर्षांखालील मुली एकेरी : गाथा देशमुख विजेती, अनन्या माहेश्वरी उपविजेती. ११ वर्षांखालील मुलांची एकेरी : अनय पाटील विजेता. मुलींची एकेरी : सुमिती ठाकूर विजेती. १३ वर्षांखालील मुलांची एकेरी : दर्शील मुनोत विजेता. मुलींची एकेरी : आरोही माहेश्वरी विजेती. १५ वर्षांखालील मुलांची एकेरी : अनामय जोशी विजेता. मुलींची एकेरी : पलक महाजन विजेती. १७ वर्षांखालील मुलांची एकेरी : नैतिक शिंदे विजेता. मुलींची एकेरी : ओवी पाटील विजेती. १९ वर्षांखालील मुलांची एकेरी : फाल्गुन पाटील विजेता. मुलींची एकेरी : पूनम ठाकूर विजेती. खुला पुरुष एकेरी : तेजस केशव विजेता. महिला एकेरी : राजश्री पाटील विजेती. पुरुष दुहेरी : प्रणव पाटील-शुभम पाटील विजेते. महिला दुहेरी : गीता पंडित-रीत नाथानी विजेत्या. मिश्र दुहेरी : राजश्री पाटील-उमेर देशपांडे विजेते. ३५ वर्षांवरील पुरुष एकेरी : चेतन वराडे विजेता. पुरुष दुहेरी : अतुल ठाकूर-चेतन वराडे विजेते. मिश्र दुहेरी : वृषाली धांडे-कीर्ती मुनोत विजेते. जैन इरिगेशन सिस्टीम्स लिमिटेडचे अध्यक्ष अशोक जैन तसेच जळगाव जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष अतुल जैन यांनी स्पर्धेतील विजेत्या व सहभागी खेळाडूंचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्य पंच दीपिका ठाकूर यांच्यासह सुफयान शेख, पूनम ठाकूर, अर्श शेख, फाल्गुन पाटील, तेजल भालेराव, वैष्णवी बोंडे, राखी ठाकूर आणि तेजम केशव यांनी पंच म्हणून जबाबदारी पार पाडली. विनीत जोशी यांनी सूत्रसंचालन केले, तर किशोर सिंह यांनी आभार मानले.

पाटील परिवाराच्या घरी दीड दिवस गणरायाची भक्तिभावात स्थापना मान्यवरांची मांदियाळी!

फुलांची सजावट, विद्युत रोषणाईत भक्तिमय वातावरण

जन सम्राट टाईम्स

कल्याण । (प्रतिनिधी): कल्याण पश्चिमेतील नव वृंदावन सोसायटी, गोडबोले हॉस्पिटलसमोर, मुरबाड रोड येथील वर्षा व विजयकुमार पाटील परिवाराच्या निवासस्थानी दीड दिवसांच्या गणरायाची मोठ्या उत्साहात व भक्तिभावपूर्ण वातावरणात स्थापना करण्यात आली. गणेशोत्सवानिमित्त संपूर्ण परिसरात आनंदाचे आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता गणरायाचे आगमन झाले.

त्यानंतर मध्यान्ह पूजनाच्या शुभ मुहूर्तावर (सकाळी ११.२० ते दुपारी १.४८) विधिवत प्राणप्रतिष्ठा, गणेश पूजन व आरती करण्यात आली. यानिमित्त पाटील परिवाराच्या निवासस्थानी आकर्षक फुलांची सजावट, विद्युत रोषणाई, तोरण तसेच पारंपरिक सजावटीने सुंदर वातावरण निर्माण करण्यात आले होते. या मंगल प्रसंगी श्री. वाल्मीक पाटील व सौ. संगीता पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत स्थानिक



नगरसेवक, विविध शासकीय व निमशासकीय विभागातील अधिकारी तसेच परिसरातील मान्यवरांनी पाटील परिवाराच्या निवासस्थानी भेट देऊन गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी मान्यवरांनी पाटील परिवाराला गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. गणरायाच्या आगमनाने कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य, महिला, युवक तसेच लहान मुलांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. सर्वांनी एकत्र येत ‘गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया’चा जयघोष केला. आरतीनंतर उपस्थित भाविकांना मोदक व लाडूचा प्रसाद वाटप करण्यात आला. दरम्यान, वर्षा व विजयकुमार पाटील परिवाराने गणेशोत्सवानिमित्त भेट देऊन गणरायाचे दर्शन घेणाऱ्या सर्व मान्यवर, नगरसेवक, अधिकारी, नातेवाईक, मित्रमंडळी व उपस्थितांचे आभार मानले. मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी गणरायाचे विसर्जन करण्यात येणार असून, भक्तिभावपूर्ण वातावरणात मिरवणूक काढण्यात येणार असल्याचे पाटील परिवारातर्फे सांगण्यात आले.

कल्याण पश्चिमेतील नव वृंदावन सोसायटी, गोडबोले हॉस्पिटलसमोर, मुरबाड रोड येथील वर्षा व विजयकुमार पाटील परिवाराच्या निवासस्थानी दीड दिवसांच्या गणरायाची मोठ्या उत्साहात व भक्तिभावपूर्ण वातावरणात स्थापना करण्यात आली. गणेशोत्सवानिमित्त संपूर्ण परिसरात आनंदाचे आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता गणरायाचे आगमन झाले.

शिक्षक भारतीची मागणी: अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन तात्काळ सुरू करा!

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी: बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न गंभीर बनला असून, याबाबत शिक्षक भारती संघटनेने शालेय शिक्षण मंत्री मा. ना. श्री. दादाजी भुसे यांना निवेदन दिले आहे. शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष श्री. सुभाष सावित्री किसन मोरे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शिक्षण उपसंचालक कार्यालयामार्फत अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे महानगरपालिका शाळांमध्ये तात्पुरत्या स्वरूपात समायोजन करण्यात आले आहे. सदर कर्मचाऱ्यांचे तात्पुरते समायोजन झाले असले तरी त्यांचे वेतन अद्यापही मूळ शाळेतूनच काढण्यात येत आहे. त्याचप्रमाणे गुजराथी, कन्नड, उर्दू इत्यादी माध्यमांच्या अल्पसंख्यांक शाळांमधील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनासाठी अद्याप समायोजन कॅम्प आयोजित करण्यात आलेला नाही. त्यामुळे या शिक्षकांचेही वेतन त्यांच्या



मूळ शाळेतून काढण्याची व्यवस्था सध्या कार्यरत आहे. शालार्थ प्रणालीत टॅब बंद - वेतन अडचणीत: परंतु, अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे शालार्थ प्रणालीमधील टॅब बंद करण्यात आल्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात महानगरपालिकेत समायोजित केलेल्या तसेच अल्पसंख्यांक शाळांमध्ये कार्यरत असलेल्या अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन काढण्यात अडचण निर्माण होत आहे. टॅब उपलब्ध नसल्याने अतिरिक्त शिक्षक कर्मचाऱ्यांचे वेतन मूळ शाळेतून काढणे शक्य होत नाही. निवेदनात पुढे म्हटले आहे की, अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाची यंत्रणा बंद करणे हे बेकायदेशीर आहे. सणासुदीचे दिवस असताना वेतन प्रलंबित ठेवल्यास या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ येईल. शिक्षक भारतीची मागणी: कृपया सर्व माध्यमातील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन सुरळीतपणे काढण्यासाठी Shalarth प्रणालीमधील AUTHORIZATION TAB तात्काळ पूर्ववत सुरू करण्यात यावा, ही विनंती शिक्षक भारतीच्या वतीने करण्यात आली आहे. या निवेदनावर श्री विजयकुमार पाटील, अध्यक्ष - शिक्षक भारती बृहन्मुंबई महानगरपालिका माध्यमिक शिक्षक संघटना यांच्यासह संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी लक्ष वेधले आहे.

प्लास्टिकमुक्त बाजारपेठेसाठी अनुभूती स्कूलच्या विद्यार्थ्यांची जनजागृती

स्काऊट-गाईड विद्यार्थ्यांचा स्तुत्य उपक्रम; दुकानदार व नागरिकांना पर्यावरणपूरक पर्यायांचा

जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी: प्लास्टिकचा वाढता वापर पर्यावरणासाठी गंभीर समस्या ठरत असताना नागरिकांमध्ये प्लास्टिकच्या वापराबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने अनुभूति इंग्लिश मीडियम स्कूलच्या स्काऊट-गाईड विद्यार्थ्यांनी ‘प्लास्टिकमुक्त बाजारपेठ – जनजागृती अभियान’ राबविले. गांधीतीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगितेअंतर्गत आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी हरी विठ्ठल नगर परिसरातील दुकानदार, किराणा व्यावसायिक आणि मेडिकल व्यावसायिकांशी प्रत्यक्ष संवाद साधत प्लास्टिकच्या



पिशव्यांचा वापर टाळण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी दुकानदारांशी संवाद साधताना “आपण स्वतः प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर करू नका आणि आपल्या दुकानात येणाऱ्या ग्राहकांनाही प्लास्टिकच्या पिशव्या वापरण्यापासून परावृत्त करा,” असे आवाहन केले. प्लास्टिकला पर्याय म्हणून कापडी पिशव्या, कागदी पिशव्या तसेच पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंचा वापर करण्याचे महत्त्वही त्यांनी समजावून सांगितले. केवळ प्लास्टिक न वापरण्याचा संदेश न देता व्यापारी आणि ग्राहक या दोन्ही स्तरांवर पर्यावरणपूरक सवयी विकसित करण्याची गरज विद्यार्थ्यांनी अधोरेखित केली. ग्राहकांना प्लास्टिकची पिशवी देण्याऐवजी त्यांनी स्वतःची कापडी अथवा पुनर्वापर करता येणारी पिशवी आणण्यासाठी प्रोत्साहित करावे, असेही विद्यार्थ्यांनी सांगितले. ‘प्लास्टिक कमी करा, पर्यावरण वाचवा’, ‘प्लास्टिकला नकार, पर्यावरणाला आधार’ अशा संदेशांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांचा थेट संवाद, साध्या भाषेतील प्रभावी आवाहन आणि पर्यावरण संवर्धनाविषयीची कळकळ यामुळे या जनजागृती अभियानाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला. शाळेबाहेर जाऊन समाजप्रबोधन गांधीतीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगितेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शाळेपुरते स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाचे धडे न देता समाजात प्रत्यक्ष जाऊन जनजागृती करण्याची संधी मिळत आहे. स्वच्छ व निरोगी परिसर निर्माण करण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असून, दैनंदिन जीवनातील छोट्या-छोट्या सवयींमध्ये बदल केल्यास प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यास मोठी मदत होऊ शकते, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. हा उपक्रम प्राचार्य रश्मी लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. गांधीतीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिता समन्वयक राजेंद्र बावस्कर, शिवम सोनवणे, पूजा पाटील आणि भावना शिंदे यांनी उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

नशिराबादमध्ये महावितरणचा जनजागृती उपक्रम!

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद। प्रतिनिधी: मार्गदर्शक सूचनांनुसार नशिराबाद शहर कक्षाच्या वतीने न्यू इंग्लिश स्कूल, हरित ऊर्जा आणि ऊर्जा बचतीबाबत जनजागृती व प्रबोधन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात नशिराबाद शहर कक्षाचे सहाय्यक अभियंता पवन सुधाकर वाघुळदे यांनी इयत्ता सातवी ते दहावीतील सुमारे ५५० विद्यार्थी-विद्यार्थिनींना विद्युत सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

दैनंदिन जीवनात विजेचा सुरक्षित वापर, विद्युत उपकरणे हाताळताना घ्यावयाची खबरदारी, विद्युत अपघात टाळण्यासाठी आवश्यक सुरक्षा नियम, वीज बचतीचे महत्त्व तसेच हरित ऊर्जा आणि सौर ऊर्जेचा वाढता वापर याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. ‘सुरक्षित वीज वापरा, विद्युत अपघात टाळा आणि ऊर्जेची बचत करा’ असा संदेश देत विद्यार्थ्यांनी विद्युत तारा, खांब आणि उपकरणांपासून सुरक्षित अंतर ठेवावे, धोकादायक विद्युत परिस्थिती आढळल्यास तत्काळ संबंधित महावितरण कार्यालयाला माहिती द्यावी, कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका बनसोडे मॅडम, राजेंद्र पाचपांडे सर, अनिल चौधरी सर यांच्यासह शाळेतील शिक्षकवृंद उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनीही कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विद्युत सुरक्षा, ऊर्जा बचत आणि हरित ऊर्जेबाबत विविध माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांमध्ये विद्युत सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासोबतच ऊर्जा बचतीची सवय आणि पर्यावरणपूरक ऊर्जेचे महत्त्व रुजविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.

'बिंदूनामावली' तपासणीचे केवळ सोंग?

भरती प्रक्रियेतील विलंबावरून स्पर्धा परीक्षा उमेदवारांचा संताप!

जन सम्राट टाईम्स

नागपूर । प्रतिनिधी: राज्यात स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या लाखो उमेदवारांमध्ये सध्या तीव्र असंतोष पसरला आहे. MPSC Group C पूर्व परीक्षा ३ जानेवारी २०२७ रोजी नियोजित असली, तरी गेल्या कित्येक वर्षांपासून राज्यातील कोणत्याही विभागात नियमित आणि वेळेवर जाहिराती प्रकाशित झालेल्या नाहीत. प्रशासनाकडून केवळ 'बिंदूनामावली (Roster) तपासणीच्या नावाखाली' वेळ काढला जात असल्याचा गंभीर आरोप 'कृती समिती महाराष्ट्र राज्य' च्या वतीने करण्यात आला आहे. निवडणूक डोळ्यासमोर ठेवून रखडपट्टी? २०२८-२९ च्या आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवूनच तर ही दिरंगाई केली जात नाही ना? असा प्रश्न उमेदवारांनी उपस्थित केला आहे. निवडणुका जवळ आल्यावर ७० हजार किंवा त्याहून मोठ्या आकड्यांची मेगाभरती जाहीर करायची, त्याचा प्रचारात गाजावाजा करायचा आणि मते पदरात पाडून घ्यायची, अशी ही रणनीती असल्याचा संशय कृती समितीने व्यक्त केला आहे. उमेदवारांची अशी मागणी आहे की, एकदाच मोठा आकडा दाखवून गाजावाजा करण्यापेक्षा दरवर्षी ठरावीक जागांची जाहिरात काढून परीक्षा घेतल्यास विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळेल. निकालांना उशीर आणि शुल्काचा भुर्दंड मुख्यमंत्री महोदयांनी स्पर्धा परीक्षांचे शुल्क १,००० रुपये करण्यामागे 'निकालांची प्रक्रिया वेगवान करणे' हे कारण दिले होते. मात्र, प्रत्यक्षात आश्वासने हवेत विरघळताना दिसत आहेत. परीक्षांमध्ये होणारे घोटाळे आणि भ्रष्टाचारामुळे सामान्य व गोरगरीब कुटुंबातील मुले नैराश्याच्या गर्तेत जात असून, काहींना आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर, कृती समिती महाराष्ट्र राज्य यांनी प्रशासकीय सुधारांसाठी आणि भ्रष्टाचाराला लगाम घालण्यासाठी खालील ५ प्रमुख मागण्या शासनासमोर मांडल्या आहेत: कृती समिती महाराष्ट्र राज्य यांच्या प्रमुख मागण्या: १) उच्चपदस्थ अधिकाऱ्यांवर थेट कारवाई: भरती प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार किंवा घोटाळा उघडकीस आल्यास, केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर व भ्रष्टाचारात समाविष्ट व्यक्तीवरच नव्हे, तर संबंधित विभागाच्या सर्वोच्च आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांवर थेट कायदेशीर कारवाई करण्यात यावी. २) अधिकाऱ्यांच्या पगारातून परीक्षा शुल्क परतावा: परीक्षा रद्द झाल्यास किंवा घोटाळा झाल्यास उमेदवारांचे परीक्षा शुल्क पूर्णपणे परत करावे. हा आर्थिक भुर्दंड शासनाने न सोसता, संबंधित विभागातील जबाबदार उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या पगारातून ती रक्कम वसूल करून उमेदवारांना दिली जावी. ३) ७५% संपत्ती जप्तीची तरतूद: भ्रष्टाचारात अडकलेली कंपनी, आयोग किंवा व्यक्ती यांच्यासोबतच संबंधित विभागातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची संपत्ती जप्त व्हावी. जर संपत्ती स्वतःच्या नावावर नसेल, तर पत्नी किंवा मुलांच्या नावावर असलेल्या संपत्तीतील ७५% भाग शासनाने आपल्या ताब्यात घ्यावा.(कारण - मुले,पत्नी सबंधित अधिकाऱ्यावर अवलंबून असतात.) ४) तारखेसहित निश्चित 'रोड मॅप': प्रत्येक भरती जाहिरातीसोबतच अर्ज भरण्यापासून ते थेट नियुक्ती मिळेपर्यंतचे संपूर्ण वेळापत्रक (Road Map) तारखेसहित जाहीर करावे. या निश्चित वेळापत्रकानुसार भरती पूर्ण न झाल्यास संबंधित विभागातील उच्च पदस्थ व वरिष्ठ अधिकाऱ्याला जबाबदार धरून कारवाई व्हावी. ५) न्यायालयीन विलंबासाठी जबाबदारी निश्चिती: नैसर्गिक आपत्ती किंवा अपवादात्मक न्यायालयीन प्रक्रियेमुळे उशीर झाल्यास मुभा असावी. मात्र, जर विभागाचे चुकीचे धोरण, त्रुटीयुक्त नियम किंवा त्रुटीपूर्ण जाहिरातीमुळे भरती प्रक्रिया न्यायालयात रेंगाळली, तर त्यास कारणीभूत असणाऱ्या संबंधित विभागातील उच्च पदस्थ अधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करून त्यांच्याकडून उमेदवारांचे शुल्क व्याजासह वसूल केले जावे. ६) भ्रष्टाचारात किंवा पेपर फुटी प्रकरणात जाहिरात अडकल्यास् संबंधित मंत्रालयाशी संबंधित मंत्र्यावर सुद्धा कारवाई करण्यात यावी, व त्यांची 30% संपत्ती जप्त करण्यात यावी.कारण त्यांच्या मंत्रालयाशी संबंधित प्रत्येक गोष्टीकरिता संबंधित मंत्री जबाबदार असतो. वरील मागण्या पूर्ण झाल्यावरच भरती प्रक्रिया व्यवस्थित पार पडणार या व्यतिरिक्त कितीही समित्या तयार करण्यात आल्यात किंवा येतील तरी सुद्धा काहीही सुधारणा होणार नाही,यासाठी विविध संघटनांनी समोर येऊन मागण्या पूर्ण करण्यासाठी आंदोलन करावे इतर कोणत्याही मागण्या करू नयेत. लाखो तरुणांचे भविष्य टांगणीला लागलेले असताना, शासन आणि प्रशासन या मागण्यांची दखल घेऊन भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणि गतिमानता आणणार का, याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. राज्यात स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या लाखो उमेदवारांमध्ये सध्या तीव्र असंतोष पसरला आहे. MPSC Group C पूर्व परीक्षा ३ जानेवारी २०२७ रोजी नियोजित असली, तरी गेल्या कित्येक वर्षांपासून राज्यातील कोणत्याही विभागात नियमित आणि वेळेवर जाहिराती प्रकाशित झालेल्या नाहीत. जात असल्याचा गंभीर आरोप 'कृती समिती महाराष्ट्र राज्य' च्या वतीने करण्यात आला आहे. निवडणूक डोळ्यासमोर ठेवून रखडपट्टी? २०२८-२९ च्या आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवूनच तर ही दिरंगाई केली जात नाही ना? असा प्रश्न उमेदवारांनी उपस्थित केला आहे. निवडणुका जवळ आल्यावर ७० हजार किंवा त्याहून मोठ्या आकड्यांची मेगाभरती जाहीर करायची, त्याचा प्रचारात गाजावाजा करायचा आणि मते पदरात पाडून घ्यायची, अशी ही रणनीती असल्याचा संशय कृती समितीने व्यक्त केला आहे. उमेदवारांची अशी मागणी आहे की, एकदाच मोठा आकडा दाखवून गाजावाजा करण्यापेक्षा दरवर्षी ठरावीक जागांची जाहिरात काढून परीक्षा घेतल्यास विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळेल.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

जुन्या पेन्शनच्या मागणीसाठी मुंबईत निर्णायक बैठक!



जन सम्राट टाईम्स

मुंबई, | प्रतिनिधी : महाराष्ट्रातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या जुन्या पेन्शन योजनेसाठी राज्यव्यापी आंदोलनाची रणनीती ठरवण्यासाठी मुंबईत महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. बैठकीचा तपशील: ही बैठक बुधवार, दि. १६/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता, सेकंडरी भवन, सेकंडरी स्कूल्स एम्प्लॉईज सोसायटी, पी. एल. काळे मार्ग, दादर, मुंबई येथील सभागृहामध्ये होणार आहे. या बैठकीसाठी राज्यातील सर्व जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय संघाच्या समन्वयकांना बोलावण्यात आले आहे. शिक्षक भारतीचे अध्यक्ष श्री विजयकुमार पाटील यांची माहिती: याबाबत माहिती देताना श्री विजयकुमार पाटील, अध्यक्ष - शिक्षक भारती बृहन्मुंबई महानगरपालिका माध्यमिक शिक्षक संघटना यांनी सांगितले की, या बैठकीमध्ये २८ सप्टेंबर पासून आझाद मैदान, मुंबई येथे होणाऱ्या बेमुदत आंदोलनाचे सर्व नियोजन करण्यात येणार आहे. "यावेळी आझाद मैदान येथे होणारे आंदोलन हे निर्णायक असणार आहे. या आंदोलनातून सर्वांना पेन्शन मिळाल्याशिवाय आपण थांबायचे नाही. पण त्यासाठी आपण मेहनत घ्यायला हवी. राज्यातील सर्व जिल्ह्यातून मोठ-मोठे मोर्चे निघतात, आंदोलने होतात पण मुंबईतून हवा तसा प्रतिसाद येत नाही," असे आवाहन समन्वयक सुभाष सावित्री किसन मोरे, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय संघ यांनी केले आहे. मुंबईकर शिक्षकांना आवाहन: श्री विजयकुमार पाटील यांनी मुंबईतील सर्व पेन्शन पिडीत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नम्र विनंती केली आहे की, कोणाच्या बोलावण्याची वाट न पाहता, स्वतःहून तन, मन, धनाने या आंदोलनात सहभागी व्हावे. राज्यातून येणाऱ्या आपल्या शिक्षक बांधवांच्या खांद्याला खांदा लावून हे आंदोलन यशस्वी करावे. एकच मिशन - जुनी पेन्शन: सर्व गट, तट, संघटना बाजूला ठेवून "एकच मिशन, जुनी पेन्शन" हे ध्येय समोर ठेवून आता लढायचे आहे. मुंबईतील सर्व शिक्षकांनी या बैठकीसाठी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन शिक्षक भारती बृहन्मुंबई च्या वतीने श्री विजयकुमार पाटील यांनी केले आहे. महाराष्ट्रातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या जुन्या पेन्शन योजनेसाठी राज्यव्यापी आंदोलनाची रणनीती ठरवण्यासाठी मुंबईत महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. बैठकीचा तपशील: ही बैठक बुधवार, दि. १६/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता, सेकंडरी भवन, सेकंडरी स्कूल्स एम्प्लॉईज सोसायटी, पी. एल. काळे मार्ग, दादर, मुंबई येथील सभागृहामध्ये होणार आहे.

जळगाव खुर्द येथे,विकास विद्यालयात विद्यार्थ्यांना ऊर्जाबचत आणि विद्युत सुरक्षेचे धडे

ऊर्जा संवर्धन व सुरक्षित वीज वापराबाबत जनजागृती

जन सम्राट टाईम्स

जळगाव ग्रामीण। प्रतिनिधी: विजेचा कार्यक्षम वापर, ऊर्जा बचत आणि विद्युत सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने विकास विद्यालय, जळगाव खुर्द येथे महावितरणच्या वतीने 'ऊर्जा जनजागृती व विद्युत सुरक्षा' या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गुरुवारी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी महावितरणचे कनिष्ठ अभियंता श्री. जयेंद्र भगवान सपकाळे तसेच नशिराबाद ग्रामीण कक्षाचे कर्मचारी देवेंद्र भालेराव, नरेंद्र परदेशी, दीक्षा बोरोले, प्रभाकर महाजन, साक्षी पाटील आणि श्रीकांत पाटील उपस्थित होते. यावेळी सादरीकरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसह शाळेचे मुख्याध्यापक अनिल नारखेडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ऊर्जा संवर्धन, सौरऊर्जा आणि विद्युत सुरक्षेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. ऊर्जेची बचत हीच भविष्यातील गरज! दैनंदिन जीवनात विजेचा अनावश्यक वापर टाळणे, विद्युत उपकरणांचा कार्यक्षम वापर करणे आणि ऊर्जा बचतीच्या सवयी अंगीकारणे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सौरऊर्जेचा वापर, स्मार्ट सोलर योजना आणि नवीकरणीय ऊर्जेचे महत्त्व यावरही माहिती देण्यात आली. 'सुरक्षित वीज वापरा, अपघात टाळा' घरात तसेच सार्वजनिक ठिकाणी विद्युत उपकरणे वापरताना



घ्यावयाची काळजी, विजेच्या तारांपासून सुरक्षित अंतर, विद्युत अपघात टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी आदी बाबींवरही मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी ही माहिती आपल्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन करण्यात आले. ऊर्जेची बचत, सौरऊर्जेचा स्वीकार आणि विद्युत सुरक्षेची जाणीव या तीनही बाबी भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असून, 'आजची ऊर्जा बचत म्हणजे उद्याच्या सुरक्षित भविष्याची गुंतवणूक' हा संदेश या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विकास विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

दुष्काळाच्या झळा; प्रशासन पोहोचले थेट शेताच्या बांधावर!

जन सम्राट टाईम्स

मलकापूर । (प्रतिनिधी): मलकापूर तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने आता थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचत परिस्थितीचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. वरखेड, लासुरा आणि भाडगणी या गावांमध्ये प्रशासनाच्या पथकाने प्रत्यक्ष शेतांमध्ये जाऊन पाहणी केली. यंदाच्या हंगामात पावसाने दिलेल्या दांडीमुळे पिकांचे नुकसान, जमिनीतील ओलाव्याची कमतरता तसेच पाण्याच्या उपलब्धतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर तहसीलदार मलकापूर यांच्या नेतृत्वाखाली तालुका कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी (BDO), संबंधित गावांचे तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक तसेच स्थानिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाहणीदरम्यान कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांची सद्यस्थिती, जमिनीतील ओलावा, पाण्याची उपलब्धता आणि



चाऱ्याची परिस्थिती याबाबत माहिती घेतली. तसेच उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर आणि पिकांची योग्य काळजी घेण्याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. पाणीटंचाईवर मनरेगातून उपाययोजनांची माहिती गटविकास अधिकारी (BDO) यांनी ग्रामीण भागातील पाणीटंचाई निवारण आणि रोजगार हमी योजनेंतर्गत करता येणाऱ्या उपाययोजनांची माहिती दिली. दुष्काळसदृश परिस्थितीत पाणी उपलब्धता वाढविण्यासाठी तसेच जलसंधारणाच्या कामांना चालना देण्यासाठी प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबतही शेतकऱ्यांना अवगत करण्यात आले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी त्यांच्या अडचणी प्रशासनासमोर मांडल्या. दुष्काळाची तीव्रता वाढण्यापूर्वीच प्रशासनाने शेताच्या बांधावर पोहोचून परिस्थिती जाणून घेतल्याने आता पुढील उपाययोजनांकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. मलकापूर तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने आता थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचत परिस्थितीचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. वरखेड, लासुरा आणि भाडगणी या गावांमध्ये प्रशासनाच्या पथकाने प्रत्यक्ष शेतांमध्ये जाऊन पाहणी केली. यंदाच्या हंगामात पावसाने दिलेल्या दांडीमुळे पिकांचे नुकसान, जमिनीतील ओलाव्याची कमतरता तसेच पाण्याच्या उपलब्धतेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून नोंदविला निषेध

जन सम्राट टाईम्स

पाचोरा : । प्रतिनिधी: येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मंगळवारी काळ्या फिती लावून कार्यालयीन कामकाज केले. वेतनवाढीचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने आंदोलनाची सुरुवात करण्यात आली आहे. न्यायव्यवस्थेचा कणा म्हणून कार्यरत असलेल्या दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा प्रश्न तब्बल २० वर्षांपासून प्रलंबित असल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. वर्षानुवर्षे शिस्तीने व प्रामाणिकपणे सेवा बजावूनही वेतनवाढीच्या मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी वाढली आहे. वेतनवाढीबाबत तातडीने निर्णय न झाल्यास १६ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत संप करण्याचा इशारा महासंघाने यापूर्वीच दिला आहे. दुय्यम न्यायालयांमध्ये कर्मचाऱ्यांवर



कामाचा मोठा ताण असल्याचा दावा करण्यात येत आहे. उपलब्ध मनुष्यबळाच्या तुलनेत कामाचे प्रमाण अधिक असल्याने अनेक कर्मचाऱ्यांना सकाळपासून संध्याकाळपर्यंत, तर काही वेळा रात्री उशिरापर्यंत काम करावे लागते. मात्र, इतर शासकीय विभागांच्या तुलनेत वेतन व सेवासुविधांमध्ये तफावत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. दरम्यान, ३१ जानेवारी २०२५ रोजी उच्च न्यायालयाने दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीबाबतचा प्रस्ताव विधी व न्याय विभागामार्फत राज्य शासनाकडे पाठविला होता. मात्र, त्यानंतर १८ महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही शासनाकडून याबाबत निर्णय झालेला नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाची बैठक घेण्यात आली. बैठकीत आंदोलनाची टप्प्याटप्प्याने रूपरेषा निश्चित करण्यात आली. त्यानुसार १६ सप्टेंबर रोजी काळ्या फिती लावून निषेध करण्यात आला. त्यानंतर १६ व १७ ऑक्टोबर रोजी काळ्या फिती लावून काम, ५ नोव्हेंबर रोजी सामूहिक रजा, तर ६ व ७ नोव्हेंबर रोजी पुन्हा निषेध आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनानंतरही शासनाने मागण्यांबाबत निर्णय न घेतल्यास १६ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत संप पुकारण्यात येणार असल्याचे महासंघाने स्पष्ट केले आहे. विविध जिल्ह्यांतील वकील संघटना तसेच लोकप्रतिनिधींनी या आंदोलनाला पाठिंबा दिल्याचे कर्मचारी महासंघाकडून सांगण्यात आले.

मुक्ती फाउंडेशनतर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

दिव्यांग संमिश्र केंद्राच्या प्रांगणात पर्यावरण संवर्धनाचा संदेश; 'एक तरी वृक्ष जगवा'चे गोसावी यांचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी: देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक सेवाभावी संस्था मुक्ती फाउंडेशनतर्फे दिव्यांग संमिश्र केंद्राच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. दिव्यांग विक्रमी रक्तदाते व वृक्षमित्र मुकुंद गोसावी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून हा उपक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी दिव्यांग संमिश्र केंद्राचे अक्षय महाजन, गोपालभाई वालेचा, वैभव निकुंभ, राजेंद्र ठाकूर यांच्यासह बालगोपाल विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षारोपणाच्या माध्यमातून पर्यावरण



संवर्धनाचा संदेश देण्यात आला. वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करणे ही काळाची गरज आहे. मात्र, केवळ प्रसिद्धी किंवा शोभेसाठी वृक्षारोपण न करता लावलेल्या प्रत्येक रोपाची निगा राखून ते जगविण्याची जबाबदारीही प्रत्येकाने स्वीकारली पाहिजे. वृक्षांचे संगोपन झाले तरच पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होईल आणि त्याचा लाभ भावी पिढ्यांना मिळेल, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. मुक्तीफाउंडेशनतर्फे जळगावातील दादावाडी परिसरातील श्रीराम नगर येथे अनेक वर्षांपासून 'वृक्षांचा वाढदिवस' हा अनोखा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमात परिसरातील झाडांना नवीन कपडे घालून, रांगोळी काढून तसेच आकर्षक विद्युत रोषणाई करून सजविले जाते. वृक्षांप्रती जिव्हाळा निर्माण करण्याबरोबरच नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाची भावना रुजविण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. "वृक्ष हे आपल्या परिवारातील सदस्यांसारखे आहेत. ते पुढील पिढ्यांसाठी अनंतकाळ संजीवनी देणारे ठरतात. त्यामुळे वृक्षारोपण करण्यासोबतच प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष जगविण्याची जबाबदारी घ्यावी," असे आवाहन मुकुंद गोसावी यांनी केले. या उपक्रमामुळे वाढदिवसाच्या निमित्ताने पर्यावरण संवर्धनाचा विधायक संदेश देण्यात आला.देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक सेवाभावी संस्था मुक्ती फाउंडेशनतर्फे दिव्यांग संमिश्र केंद्राच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. दिव्यांग विक्रमी रक्तदाते व वृक्षमित्र मुकुंद गोसावी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून हा उपक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी दिव्यांग संमिश्र केंद्राचे अक्षय महाजन, गोपालभाई वालेचा, वैभव निकुंभ, राजेंद्र ठाकूर यांच्यासह बालगोपाल विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षारोपणाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करणे ही काळाची गरज आहे. मात्र, केवळ प्रसिद्धी किंवा शोभेसाठी वृक्षारोपण न करता लावलेल्या प्रत्येक रोपाची निगा राखून ते जगविण्याची जबाबदारीही प्रत्येकाने स्वीकारली पाहिजे. वृक्षांचे संगोपन झाले तरच पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होईल.

'डिजिटल व्यवहार करा, पण सतर्क राहा'!

जन सम्राट टाईम्स

जळगाव | प्रतिनिधी: डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर लक्षात घेता ऑनलाइन फसवणुकीपासून सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक असलेली खबरदारी विद्यार्थ्यांनी जाणून घेणे गरजेचे आहे. याच उद्देशाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (KBCNMU), जळगाव आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ।येथे सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रात स्नेहल पाटील आणि वैष्णवी पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सायबर फसवणुकीच्या विविध पद्धतींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. OTPद्वारे होणारी फसवणूक, QR कोडच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक, AI व्हॉइस कॉल, ऑनलाइन बँकिंग फसवणूक, बनावट कस्टमर केअर कॉल, फिशिंग लिंक तसेच सोशल मीडिया फसवणूक यांची माहिती प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून देण्यात आली. ऑनलाइन व्यवहार करताना OTP, PIN किंवा बँक खात्याशी संबंधित गोपनीय माहिती कोणाशीही शेअर करू नये, अनोळखी लिंकवर क्लिक करू नये तसेच संशयास्पद ॲप डाउनलोड करण्यापूर्वी त्याची खातरजमा करावी, असे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले. त्याचबरोबर मजबूत पासवर्डचा वापर आणि टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन (2FA) सुरू ठेवण्याचे महत्त्वही समजावून सांगण्यात आले. दरम्यान, क्विक हील फाउंडेशनतर्फे विकसित करण्यात आलेल्या Anti-Fraud App चे ॲक्टिवेशन करण्यात आले. डिजिटल फसवणुकीपासून संरक्षण मिळविण्यासाठी या ॲपचा उपयोग कसा करता येईल, याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.